NAVJYOT / Vol. IX / Issue – III ISSN 2277-8063

# कोरोना आणि राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय राजकारण

**प्रा. विजयकुमार श्रीपतराव पानस्कर,** राज्यशास्त्र विभाग, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा. मो. ९१५८८७८४०३

.................................................................................................

**प्रास्ताविक —**

कोरोना ही वैश्विक आपत्ती बनली आहे. कोरोना महामारीमुळे आज समाजकारण अर्थकारण, राजकारण, परराष्ट्र धोरण, मुल्यव्यवस्था आणि मानवी वर्तनात बदल होत आहे. हे आपण जानेवारी २०२० पासून पाहत आहोतच. कोरोना महामारीने आज व्यक्ती — व्यक्ती, व्यक्ती — समाज, व्यक्ती — विज्ञान आणि व्यक्ती — निसर्ग यांच्या संबंधात आमूलाग्र बदल होताना दिसत आहे. थोडक्यात कोरोना महामारीने परिणाम अखंड जागावर होवून स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय राजकारण, समाजकारण आणि अर्थकारण यांची घडी विस्कटली आहे. परिणामी राज्यसंस्थांसमोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यापैकी अत्यंत महत्वाचा प्रश्न म्हणजे राज्यसंस्थांना त्यांची मूलभूत कर्तव्ये पार पाडण्यात कोरोना महामारी अडसर ठरली आहे. राज्यसंस्थेची आज व्यक्ती स्वातंत्र्याचे संरक्षण करताना दमछाक होताना दिसते. थोडक्यात राज्यसंस्थेला तिचे कर्तव्य पार पाडणे कठीण बनले आहे, असे म्हणावे लागेल. अशा परिस्थितीत राज्यसंस्थांनी वेगवेगळया भूमिका स्वीकालेल्या आपणास दिसतात. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करताना कोरोणा महामारीमुळे बदलेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारण यांचा अभ्यास करण्याची आवश्यकता प्रतिपादित केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये —**

प्रस्तूत शोधनिबंधाची मांडणी करताना पुढील उद्दिष्टये ठेवली आहेत.

१. कोरोना महामारीमूळे बदलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करणे.
२. कोरोना महामारीकाळात राजकीय नेतृत्वानी घेतलेल्या निर्णयाचा व त्याच्या परिणामाचा अभ्यास करणे.

**कोरोना सुरूवात —**

अखंड जगाला ग्रासलेल्या या कोरोना महामारीची सुरूवात चीनमधील वुहाण शहरातून झाली. व्यक्ती — व्यक्तीमधील संपर्कातून कोरोनाचा फैलाव सुरू होवून आज जगातील बहुतांश देशांना त्याने व्यापले आहे. तर आज असाही विचारप्रवाह समोर येत आहे की, कोरोना संकटाने प्रत्येक देशातील आर्थिक शहरांनाही प्रभावित केले आहे. उदाहरणादाखल पहायचे झाले तर, न्यूयॉर्क, पॅरिस, दिल्ली, मुंबई, मिलान, रोम, केपटाउन या शहारात कोरोना संक्रमित लोकांची संख्या प्रचंड वाढली आहे. ती आजही थांबण्याचे नांव घेत नाही, अथवा त्यात घटही होताना दिसत नाही. तर दुसऱ्या बाजूला जागतिक पातळीवर आर्थिक वर्चस्व प्राप्त करण्यासाठी कोरोनाची निर्मिती चीनने केली, अशा आशयाची मांडणी जगभरातील अभ्यासक करत आहेत. तर जागतिक पातळीवर अनेक राजकीय नेत्यांनीसूध्दा यावर अनेक विधाने केली आहे.

**कोरोना आणि जागतिक राजकारण —**

कोरोना निर्मूलनासाठी आज गावपातळीपासून ते आंतरराष्ट्रीय पातळीवर आरोग्य प्रशासन व सरकारी यंत्रणा काम करताना दिसत आहेत. आज वैद्यकीय सेवा व संसाधनांच्या देवाणघेवाणीवरून राजकारण होत आहे. हे राजकारण एकाचवेळी दोन पातळयांवर म्हणजे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर घडत आहे. चीन या माध्यमातून जागतिक आर्थिक व राजकीय वर्चस्व, सत्ताप्राप्तीचा प्रयत्न करीत आहे. तर दुसऱ्या बाजूला जगातील प्रत्येक राष्ट्रांतर्गत घटक राज्यातील सरकारे आणि केंद्र सरकार यांच्यात आरोप — प्रत्यारोप होताना दिसत आहेत. तरी काही राष्ट्रांत केंद्र सरकारच्या धोरणाचा रोख पाहून राज्य सरकारे आपली भूमिका ठरवित आहेत.

कोरोना महामारीने जागतिक राजकारणावर, राष्ट्रांच्या पराराष्ट्र धोरणावर आज विविध प्रकारे प्रभाव टाकला आहे. त्यातून जागतिक राजकारणाचे स्वरूप आणि राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण

बदलत चालले आहे. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर अमेरिका — चीन, चीन — ब्राझील, अमेरिका — भारत, जर्मनी — इटली, इटली — फ्रान्स, कोलंबिया — व्हेणेझूएला या राष्ट्रांत कोरोना महामारीवरून संघर्ष अथवा राजकारण सुरू आहे. अमेरिकेने मध्यंतरीच्या काळात भारताला हायड्रोक्सीक्लोरोक्वीन देण्यासाठी दबावतंत्राचा वापर केला. तर जर्मनी कोरोना रोगावर लस तयार करीत आहे. अमेरिकेने त्या लसीचे सर्वाधिकार आपणाकडे मिळविण्यासाठी जर्मनीव दबाव आणण्याच्या प्रयत्नात आहे. तर जागतिक संघर्ष किंवा राजकारणाचे तिसरे उदाहरण म्हणजे स्पेनला विविध एनजीओनी वैद्यकीय सेवा व संसाधनांची मदत जहाजाने पाठविली होती. ती वैद्यकीय सेवा संधानांची जहाजे तुर्कीने अडविली. थोडक्यात आज कोरोना महामारीमुळे जागतिक स्तरावर डावपेचाचे, दबावतंत्राचे राजकारण सुरू झाले आहे आणि या राजकारणाचा प्रभाव विविध राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणावर होवून हा संघर्ष शिगेला पोहचताना दिसत आहे. कोरोना महामारी आणि राष्ट्रांची भूमिका याविषयी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स्च्या इन्स्टिटयूट ऑफ ग्लोबल अफेअर्सच्या संशोधिका, सोफिया गॅस्टन असे मत मांडतात की, कोरोना हे जगावरील संकट समजून सर्व राष्ट्रांनी एकत्र येवून सर्वाच्या सहकार्याने त्याचा प्रतिकार करायला पाहिले. परंतू आज तसे घडताना दिसत नाही. याउलट बहुतांश राष्ट्रे आपल्या राष्ट्रीय हिताला सर्वाधिक महत्व देत आहेत. त्याची उदाहरणे सांगताना सोफिया गॅस्टन म्हणतात की, इटलीमध्ये कोरोनाने थैमान घातल्यानंतर त्यांच्या शेजारी राष्ट्रे जर्मनी व फ्रान्सकडे वैद्यकीय मदतीची मागणी केली. त्यावेळी या दोन्ही देशांनी वैद्यकीय संसाधनांच्या निर्यातीवर बंदी घातली. नेमक्या याच संधीचा फायदा घेवून चीनने आपली एक डॉक्टरांची टीम इटलीला मदतीसाठी रवाना केली. थोडक्यात याचा अर्थ असा की, आज अमेरिकेची जागा चीन घेवू पाहत आहे किंवा तसा प्रयत्न चीनने सुरू केला. भारताच्या संदर्भात ही सीमाविवाद पून्हा उकरून काढून चीन सीमेवर हल्ले करताना दिसत आहे. अशा परिस्थीत आर्थिक व राजकीय महासत्ता म्हणून ओळखली जाणारी अमेरिकाही डावपेचात्मक हालचाली करताना दिसत आहे. अमेरिका डावपेचाचा एक भाग म्हणून विविध धोरणे आखून चीनला अडचणीत आणण्याचा प्रयत्न करताना दिसत आहे. त्याचाच एक भाग की काय म्हणून अमेरिका कोरोना निर्मूलनाबरोबरच कार्य संस्कृती जोपासताना दिसत आहे. यातून असे म्हणता येते की, आजही अमेरिकेला सत्ता व आर्थिक वर्चस्व काय ठेवणे महत्वाचे वाटते. त्याला राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे 'अमेरिका फस्ट' हे धोरण दुजोरा देते. परंतू डोनाल्ड ट्रम्प यांनाही राष्ट्रांतर्गत राजकीय नेतृत्वाच्या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. उदाहरणार्थ अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा उपसल्लागार बेन ऱ्होडस् यांच्या मते, आज जागतिक पातळीवर ज्या राष्ट्रांनी उजव्या विचारसरणीच्या नेतृत्वाकडे आपल्या राष्ट्राची सत्ता सोपविली आहे, ती राजकीय नेतृत्व कोरोना महामारी थांबविण्यात अपयशी ठरली आहेत. बेन ऱ्होडस् यांनी उजव्या विचारसरणीच्या राष्ट्रांत अमेरिकेबेरोबरच रशिया, इंग्लंड, ब्राझीलचाही समावेश केला आहे. परंतू वास्तविक पातळीवर आपण विचार केला तर असे दिसते की, बेन ऱ्होडस् उजव्या विचारसरणीच्या राष्ट्रात इटली, स्वीडन, हंगेरी, इक्वेडोरचा समावेश करत नाहीत. यावरून त्यांची मांडणी एकांगी वाटते.

**कोरोना आणि भारतीय राजकारण —**

कोरोना महामारीच्या संदर्भात भारताचा विचार करता येथील लोकसंख्या जवळपास १३० कोटीच्या वर आहे. आरोग्यविषयक सेवासुविधा, संसाधनांचा विचार करता जागतिक आरोग्य निर्देशांकामध्ये भारताचे स्थान १४४ व्या क्रमांकावर आहे. थोडक्यात भारताकडे आज पर्याप्त वैद्यकीय सेवा—सुविधा नाहीत. तरीही आपण उपलब्ध संसाधने, यंत्रणेचा पुरेपूर वापर करून कोरोना महामारीशी लढा देत आहोत. जेव्हा भारतातील घटक राज्यसरकारांचा विचार करायला लागतो, तेव्हा बहुतेक घटक राज्ये आपल्या सोईप्रमाणे केंद्राशी अनुकूल तर काही घटक राज्य सरकारे केंद्रापेक्षा वेगळी आणि प्रभावी भूमिका घेताना दिसत आहेत. त्यांनी घेतलेल्या या वेगवेगळया भूमिकेने कोरोना आजार रोखण्यात त्यांना काही प्रमाणात यशही येताना दिसत आहे. उदाहरणादाखल सांगायचे झाले तर, भारतातील कोरोनाचा पहिला रूग्ण ३० जानेवारी २०२० मध्ये केरळ राज्यात आढळला. तेव्हा केरळ सरकारणे आवश्यक ती वैद्यकीय व प्रशासकीय धोरणे ठरवून त्यांची अंमलबजावणी सुरू केली. पुढे आवश्यक

काळजी म्हणून ब्रेक द चेन सारखी धोरणे राबविली. परिणामी केरळमध्ये कोरोना संक्रमण होण्याचे प्रमाण मंदावत जावून ते शुन्यावर आणता आले. थोडक्यात केंद्र सरकारच्या भूमिकेपेक्षा वेगळी व प्रभावी भूमिका केरळ राज्य सरकारने घेवून कोरोनाचा प्रार्दुभाव थांबविण्याचा प्रयत्न केला. याउलट दुसरीकडे याचकाळाता केद्र सरकार दिल्ली विधानसभा निवडणूक कशी जिंकायची ? याविषयी विचार करीत होते. दरम्यानच्या काळात भारतात विदेशातून १४ लाख ९० हजार नागरिक हवाई, जलमार्गाने आले होते. त्यांची तपासणी, चौकशी करण्यासाठी आवश्यक यंत्रणा व त्याकडे केंद्रीय नेतृत्वाचे लक्ष नव्हते. तर सरकारमधील व बाहेरील काही राजकीय नेतृत्वे गोमूत्र व शेणामूळे कोरोना बरा होतो, असे दावे किंवा संदेश सोशल मिडीयाच्या माध्यमातून देत होते. याच काळातील भारताच्या जागतिक पातळीवरी आयात – निर्यातीचा, व्यापाराचा विचार करता आपण वैद्यकीय संसाधनांची निर्यात करीत होतो. तर याचवेळी दिल्ली, महाराष्ट्र, केरळ, पंजाब, तेलंगणा या राज्यातील कोरोना संक्रमितांचे आकडे पाहता ही राज्य सरकारे केंद्राकडे वैद्यकीय सेवांची मागणी वारंवार करीत होती. परंतू आवश्यक ती सुविधा – संसाधने या राज्यांना विहित वेळेत मिळाल्या नाहीत. परिणामी या राज्यांनी केंद्रापेक्षा वेगळी भूमिका घेण्यास सुरूवात केली. पुढे काही अभ्यासकांनी या राज्यातील सरकारे केंद्रातील सत्तारूढ पक्षाच्या विरोधातील आहेत. त्यामुळे त्यांना पर्याप्त मदत मिळत नसल्याची मांडणी केली. परंतु केंद्राकडेच आवश्यक संसाधने नसतील तर राज्यांना कोठून मिळणार ? याप्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते. थोडक्यात कोरोना महामारीमुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर राजकारण होताना दिसत आहे.

सद्यकाळात राजकारणापेक्षा सहकार्याच्या भावनेची आवश्यकता आज जगाला आहे. परंतू हे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर राजकारण जर असेच सुरू राहिले तर अखंड मानवजात संपुष्टात येण्याचा धोका नाकारता येत नाही. म्हणून हे सर्व थांबविणे गरजेचे आहे. अमेरिकेलाही आज थॉमस पेन यांच्या आणि भारताला महात्मा फुले, महात्मा गांधी, पंडीत नेहरूंच्या मानवतावादी विचारांचा विसर पडत चालला आहे. म्हणून जसे संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये विश्वात्मक परमेश्वराजवळ पसायदान मागितले. त्यांनी स्वत:साठी काहीही न मागता 'भूता परस्परे पडो मैत्र जिवांचे' या शब्दांत विश्वबंधुत्वाचे वरदान मागितले. त्यांनी 'हे विश्वची माझे घर' आहे, असे मानले. तेव्हा आदर्श डोळयासमोर ठेवून मानवता, बंधूता व सामाजिक न्यायाचा विचार करून जागतिक पातळीवर सर्वांनी एकत्र येवून सामाजिक एकांतवाद स्वीकारणे गरजेचे वाटते. वेळोवेळी शासकीय धोरणांचे पालन करून कोरोना महामारीला संपविण्याची आवश्यकता आहे.

संदर्भग्रंथ –

१. बीबीसी न्यूजवरील सोफिया गॅस्टन यांची मुलाखत.
२. दैनिक शब्दराज, कराड.
३. दैनिक सकाळ, कोल्हापूर.
४. जय ध्रुवशंकर, कोरोना आणि लोकशाही – हुकुमशाही, ऑब्जरव्हर रिसर्च फौंडेशन.
५. पवार प्रकाश, कोरोनाचे राजकारण आणि पेच, दैनिक सकाळ.